




# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २७० वा गुरूवार दि ०८ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# आम्ही एकत्र येण्याचं सर्वात महत्त्वाचं कारण राज ठाकरेंचा मोठा गौप्यस्फोट, सामनाच्या मुलाखतीत उद्धव ठाकरेंसमोर म्हणाले...

वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सामनासाठी संयुक्त मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याची परिस्थिती, मराठी माणसाचे अस्तित्व, मुंबईचे प्रश्न आणि आगामी महापालिका निवडणुका यावर सविस्तर चर्चा केली. खासदार संजय राऊत आणि अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर मुलाखतकारा होते. मुलाखतीत संजय राऊत यांनी विचारलं की महाराष्ट्र ज्या क्षणाची वाट पाहत होता, २० वर्षांनंतर आपण दोघे ठाकरे बंधू एकत्र येऊन मुंबई, मराठी माणूस आणि महाराष्ट्रावर चर्चा करत आहात, पण हा दिवस उजाडण्यासाठी महाराष्ट्राला २० वर्षे वाट का पहावी लागली? यावर राज ठाकरे म्हणाले, की काही गोष्टी का घडतात, कशा घडल्या, काय झालं? हे आज आता सोडून दिलं पाहिजे. महेश मांजरेकरांना दिलेल्या मुलाखतीत मी सांगितलं होतं की, कुठल्याही भांडणापेक्षा आणि वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आज संकट महाराष्ट्रावर आहे, मुंबईवर आहे, महाराष्ट्रातील अनेक शहरांवर आहे. हे संकट काय आहे हे मराठी माणसाला समजलेलं आहे. काय प्रकारचं राजकारण महाराष्ट्रात सुरू आहे याची जाणीव त्याला आहे. ही एकच गोष्ट आम्ही एकत्र येण्याचं सर्वात महत्त्वाचं कारण आहे.राज ठाकरे पुढे म्हणाले, की आज हा आमच्या अस्तित्वाचा विषय नाही. महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या अस्तित्वाचा विषय आहे. या विषयावर अनेक वर्षे मी बोलतोय, उद्धवही बोलतोय. आज अशा एका वळणावर ही निवडणूक आणि महाराष्ट्र उभा आहे, ज्याला आपण अभी नही तो कभी नही म्हणतो तशा वळणावर. तशी परिस्थिती मुंबईवर, ठाण्यावर येऊन ठेपलेली आहे. खरं तर एमएमआर रिजनवर येऊन ठेपलेली आहे. एमएमआर रिजन मी मुद्दाम बोलतोय. या सगळ्या गोष्टींचा विचार करून आज आम्ही एकत्र येणं गरजेचं आहे. आज एकत्र नाही आलो आणि आज एकजुटीने सामना नाही केला तर मला असं वाटतं, महाराष्ट्र आम्हाला माफ नाही करणार! उद्धव ठाकरे म्हणाले की, खरं तर, आम्ही दोन भाऊ एकत्र आलो



हा भावनिक मुद्दा आहे. पण दोन भाऊ एकत्र आले याचा अर्थ महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसानं एकत्र आलं पाहिजे. महाराष्ट्र वाचवायचा असेल तर आपल्याला एकजूट दाखवावीच लागेल. पक्ष, राजकीय मतं वेगळी असतील, पण आपण मराठी आहोत. महाराष्ट्र आपला आहे आणि आपण जर एकमेकांमध्ये वेगळ्या चुली मांडल्या, तर महाराष्ट्र तोडणारे त्यांची पोळी भाजून जातील.

# कालवा आरसीसी टर्फचे काम निकृष्ट; शेतकऱ्यांचा आरोप

## पेनटाकळी कालव्याला तडेः माजी सरपंचांचे उपोषण

जनसंचलन/ हिवरा आश्रम

पेनटाकळी कालवा १ ते ११ किमी या टप्प्यातील आरसीसी टर्फचे काम शासनाकडून मंजूर झाले असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे; मात्र सध्या अंदाजे १ ते ३ किमीपर्यंत पूर्ण झालेल्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या आरसीसी टर्फचे काम दर्जेदार करण्याची मागणी करीत दुधा येथील माजी सरपंच एकनाथ जगन्नाथ सास्ते यांनी बुधवारपासून उपोषण सुरू केले आहे. कालव्याच्या आरसीसी टर्फच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर चुरी वापरण्यात आल्याने अवघ्या काही दिवसांतच टर्फला तडे गेले आहेत. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, शासनाचा निधी वाया जात असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. या पार्श्वभूमीवर दुधा, रायपूर, ब्रह्मपुरी, पेनटाकळी, सोनारगव्हाण व सावत्रा येथील शेतकऱ्यांनी गुरुवारी जिगाव प्रकल्प-मेहकर कार्यालयाकडे लेखी मागणी सादर करत या कामासाठी शासनाने मंजूर केलेली निविदा सर्व शेतकऱ्यांना पाहण्यासाठी सार्वजनिक करावी, अशी मागणी केली आहे. १ ते ३ कि.मी.पर्यंत कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप हिवरा आश्रम परिसरात पेनटाकळी प्रकल्पातून निघालेल्या कालव्याचे आरसीसी टर्फचे काम सुरू असताना अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या गैरप्रकाराविरोधात संबंधित गावचे माजी सरपंच यांनी संतप्त भूमिका घेत काम तत्काळ बंद पाडले असून, जोपर्यंत दर्जेदार व नियमानुसार काम होत नाही, तोपर्यंत उपोषणावर बसण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. दुधा येथील माजी सरपंच एकनाथ सास्ते यांनी कालव्याचे काम थांबविले.

# शहरात शांतता झोन पण नियम पाळते कोण ?

जनसंचलन/ खामगाव



उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, खामगाव नगरपालिका प्रशासनाने शहरातील न्यायालय परिसर, शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, तसेच रुग्णालयांच्या सभोवतालचा परिसर शांतता झोन म्हणून घोषित केला आहे; मात्र प्रत्यक्षात या नियमांची शहरात पायमल्ली होत असून, आवाजाच्या मर्यादेचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील प्रमुख रुग्णालये व शाळांच्या परिसरात मोठ्या आवाजात हॉर्न वाजवणे, कर्कश सायलेन्सर असलेल्या दुचाकींचा वापर, सार्वजनिक कार्यक्रमांतील ध्वनीक्षेपकांचा प्रचंड आवाज, तसेच लग्नसमारंभात मोठ्या आवाजात वाजवले जाणारे डीजे यामुळे रुग्ण, विद्यार्थी व नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रशासनाने शांतता झोन जाहीर केला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा कार्यरत नसल्याचे स्पष्ट होत आहे.



# महायुतीचा महाविजय...

पैशांकडे पैसा जातो; तद्वतच सत्तेकडे सत्ता जाते, याचे प्रत्यंतर राज्यातील नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकीत आले आहे. सरकार स्थापनेनंतर वर्षभराने आलेल्या या निवडणुका सत्ताधारी महायुतीने दणदणीत बहुमताने जिंकून विधानसभेच्या निकालांची पुनरावृत्ती केली आहे; त्यातही भारतीय जनता पक्षाने महायुतीमध्येसुद्धा आपणच ङ्गमहाशक्तीफ असल्याचे दाखवून दिले. २८८ जागांपैकी भाजपने सर्वाधिक, म्हणजे सुमारे सव्वाशे, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५०हून अधिक, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ४० ठिकाणी विजय मिळवला आणि महायुतीची गोळाबेरीज विधानसभेइतकीच असल्याचे दिसून आले. या निवडणुकीत विरोधकांचा पुन्हा सफाया झाला. काँग्रेसने ३५-४० पर्यंत मजल मारली; तर राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि शिवसेना (उबाठा) यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कशीबशी दोन आकडी संख्या गाठता आली. या निवडणुका स्थानिक पातळीवर लढवल्या गेल्या असून, अनेक पक्षांचे झेंडेही नावापुरतेच असल्याने आकड्यांबाबत परस्परविरोधी दावे आहेत; तरीही ङ्गमहायुतीचा महाविजय आणि विरोधकांचे पानिपतफ हे निकालांतून समोर आलेले सर्वमान्य वास्तव ठरते. राज्यातील छोट्या शहरांमध्ये पार पडलेल्या या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका मानल्या जातात. मात्र, करोनासाथीचा काळ आणि नंतर इतर मागासवर्गाच्या आरक्षणाचा तिढा यामुळे मुदत उलटून गेल्यावरही येथे प्रशासकांचे राज्य होते. या काळात अस्वस्थ स्थानिक नेतृत्वामध्ये प्रचंड चुरस दिसली. अनेकांचे पक्ष आणि नेत्यांच्या निष्ठांची सरमिसळ झाल्याचे निवडणुकीतून दिसले. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील कोणत्या पक्षाचे नेते कोणाच्या बाजूने निवडणूक लढवत आहेत, हे समजण्यापलीकडचे ठरले. मित्रपक्षांच्या विरोधात जाऊन विरोधकांना मिळालेल्या नेत्यांपैकी काहींनी आपले अस्तित्व दाखवून दिले, तर काहींना मतदारांनी नाकारले. सत्ताधारी भाजपने सव्वाशे ठिकाणी विजय मिळवून अपेक्षेप्रमाणे आपला वरचष्मा दाखवून दिला. विदर्भातील नागपूर भागात विजय मिळवताना चंद्रपूरसारख्या ठिकाणी मात्र काँग्रेसने भाजपला धक्का दिला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही कोकणासह अन्य भागांमध्ये अर्धशतकी कामगिरी केली. अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यासह अन्य काही ठिकाणी वर्चस्व राखले. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील नेत्यांवर घराणेशाहीचे आरोप झाले. अनेक मंत्री आणि आमदारांच्या कुटुंबीयांचा बिनविरोध विजय, हे अर्थातच राजसत्तेच्या वापराशिवाय शक्य नाही; परंतु त्यातून निष्ठावान कार्यकर्ते अन्यायाचे बळी ठरले. विजयाच्या जल्लोषात त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले, तरी भविष्यात हे महागात पडू शकते, याची जाणीव ठेवली पाहिजे. नांदेडमधील लोहासारख्या ठिकाणी भाजपच्या नेत्यांच्या कुटुंबातील सहा जणांना घरी बसवून जनतेने याची झलक दाखवलीच आहे. गेले काही दिवस मतदारांना तीर्थस्थळांच्या यात्रा घडवण्यापासून ते मताला चार-पाच हजार रुपये देण्यापर्यंत चर्चेत आलेल्या अनेक कथा लोकशाहीची चाड असणाऱ्या नागरिकांच्या चिंतेत भर घालणाऱ्या आहेत. राज्याच्या अर्धशहरी भागांमध्ये आता लोकप्रतिनिधींची राजवट सुरू होणार असून, आता तरी गटबाजी-मोठेपणा बाजूला ठेवून विकासाच्या दिशेने कारभार सुरू होईल, ही अपेक्षा आहे. महापालिकांच्या निवडणुकांची उपांत्य फेरी मानल्या गेलेल्या या निवडणुकांमध्ये मिळालेल्या विजयाने महायुतीला आणखी बळ आल्यास नवल नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसनेही आपले अस्तित्व राखले, त्यासाठी शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना ताकदही दिल्याचे दिसले. दुसरीकडे ङ्गया निवडणुकीत धनशक्ती आणि सरकारी यंत्रणांचा मोठा वापर झाला,फ असा आरोप काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे. या आरोपात तथ्य असले, तरी विरोधकांच्या पाडावाचे ते एकमेव कारण नव्हे. विधानसभेच्या निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर विरोधक अद्याप सावरलेले नाहीत, हा त्याचा सरळ अर्थ आहे. भाजपचे नेते ठिकठिकाणी प्रचारासाठी फिरत असताना काँग्रेस, शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाने ही निवडणूक स्थानिक कार्यकर्त्यांवरच सोडून दिल्याचे चित्र आहे. आता महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. या निवडणुकांमध्येही ङ्गउबाठाफचे लक्ष राज्यापेक्षाा मुंबईकडेच जास्त दिसते. ताज्या निकालाने सत्ताधाऱ्यांना बळ देतानाच विरोधकांना एकीचा संदेश दिला आहे; त्यातून विरोधक काही शहाणपणा शिकणार, की अजूनही गटबाजीचाच कित्ता गिरवत बसणार, यावर महापालिकांमधील त्यांचे अस्तित्व अवलंबून आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाण्यात ठाकरेंचा गेम, पक्षाच्या उमेदवारांचा अर्ज बाद, तरीही हार मानली नाही, आता मोठी खेळी..

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत दोन प्रभागात शिवसेनेच्या (उबाठा) उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने आता थेट येथील बंडखोर अपक्ष उमेदवारांना पक्षाने पाठिंबा जाहीर केला आहे. या उमेदवारांनी उबाठात जाहीर प्रवेश केला आहे. त्यामुळे युतीच्या उमेदवारांसमोर या उमेदवारांच्या रूपाने तगडं आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. ठाण्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी राजकीय नाट्य रंगले. शिवसेनेचे (उबाठा) प्रभाग क्रमांक : पाचचे (ब) उमेदवार दादाभाऊ रेपाळे यांनी नाट्यमयरित्या उमेदवारी अर्ज मागे घेतला. ते 'नॉट रिचेबल' असल्याचा आरोप शिवसेनेचे (उबाठा) नेते राजन विचारे यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार



परिषदेत केला. त्यामुळे वसंत विहार येथील या प्रभागात शिवसेनेकडून रिंगणात असलेल्या जयश्री डेव्हिड यांच्यासमोरील उबाठाचे आव्हान संपुष्टात आले होते.मात्र याठिकाणी भाजपकडून इच्छुक असलेले पक्षाचे ठाणे शहर ओबीसी मोर्चा सरचिटणीस विक्रम चव्हाण यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केला होता. मात्र तो अर्ज त्यांनी स्वतः उमेदवारी मागे घेतलेली नसताना त्याच्या सुचकाच्या एका अर्जावरुन मागे घेत असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यावरून चव्हाण यांनी अर्ज दाखल करण्याच्या ठिकाणी प्रचंड गोंधळ घातला. याबाबत चित्रफीत समाज माध्यमांवर वायरल झाली. त्यांनी संबंधित महिला अधिकाऱ्यांना जाब विचारला. तेव्हा त्यांना पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात घेण्यात आले. त्यामुळे जयश्री डेव्हिड यांची निवडणूक बिनविरोध होण्यात अडसर निर्माण झाला.अखेर विक्रम चव्हाण यांनी दाखल केलेल्या अपक्ष अर्जाच्या आधारे त्यांना शिवसेनेने (उबाठा) पाठिंबा जाहीर केला. त्यांचा उबाठा नेते राजन विचारे, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश पार पडला असून त्यांच्या समर्थनार्थ पक्षाचे स्थानिक पदाधिकारी आता मैदानात उतरले आहेत. वागळे इस्टेट येथील प्रभाग क्रमांक १६ चे (ड) शिवसेनेचे माजी नगरसेवक माणिक पाटील यांना पक्षाने यंदा उमेदवारी नाकारल्याने त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. या प्रभागात काँग्रेसमधून शिवसेनेत आलेल्या मनोज शिंदे यांना उमेदवारी दिल्याने पाटील नाराज होते. तर दुसरीकडे या प्रभागात उबाठा उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने पाटील यांनाही उबाठाने पुरस्कृत करत पक्षात प्रवेश दिला. गेल्या निवडणुकीत पाटील यांनी यंदाचे त्यांचे शिवसेनेतील प्रतिस्पर्धी उमेदवार मनोज शिंदे यांचे बंधू शैलेश शिंदे यांचा पराभव केला होता. त्यामुळे या प्रभागामध्ये चुरशीचा सामना रंगण्याची चिन्हे आहेत.

## मुंबईत ठाकरेच पाहिजेत का ? जरांगे पाटील बघा काय म्हणाले ?

**जालना :** मुंबईत नेमकी कुणाची सत्ता यावी? याबाबत मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. 'कुणीही जिंकून आलं तरी आम्हाला काही फरक पडत नाही. आमच्या गोरगरिबाच्या जीवनात कधीच बदल होणार नाही. आम्हाला काम आणि कष्ट करावे लागणार. लोकांच्या कंपन्यांमध्येच काम करावं लागणार आहे. माथाडी कामगार म्हणून आम्हाला हमालीच करावी लागणार आहे. हॉटेल आणि टपऱ्याच चालवाव्या लागणार आहेत. हातगाड्यांवरच काम करावे लागणार आहे. कुणीही आलं तरी बदल थोडी होणार आहे. ह्यांचे पावणे रावळे सुधारणार आहेत', असं मनोज जरांगे सुरुवातीला म्हणाले.ह्यांना भूखंड पाहिजे. ह्यांना म्हाडाच्या सर्व जागा पाहिजेत. हे मोठमोठे ग्राऊंड साफ करतात. ह्यांना समुद्राचीदेखील जागा कमी पडते. आता ते आदिवासींचं एक बेट आहे. ते बेटसुद्धा ह्यांना पुरत नाही. त्यांनी पलिकडे गुलाल टाकून उद्घाटनदेखील केलं. ह्यांना त्यांचे उद्योगधंदे चालले पाहिजेत. त्यासाठी ह्यांचे प्रयत्न असतात. आम्हाला काहीच फरक पडणार नाही. गोरगरिबाच्या जीवन प्रवासात काही बदल होणार आहेत का? याचं उत्तर नाही असं आहे. त्यांच्यातील लोकं सुधारणार आहेत. पण त्यावेळेस आपण म्हणालोच होतो. त्यात बदलायचं कारण नाही. मी बदलतो कुठे? लोकांची ती म्हणच आहे की, मुंबईत ठाकरे पाहिजेत. आमची कुठे म्हण आहे?', असं मनोज जरांगे म्हणाले आहेत. दरम्यान, भाजपचे केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांच्या वक्तव्यावर मनोज जरांगे पाटील संतापले आहेत. 'केंद्र सरकारमधील एखाद्या मंत्र्याने बेजबाबदार वक्तव्य करु नये. छत्रपती शिवाजी महाराजांनी अन्याया विरोधात लढाया उभारल्या. एखाद्या महापुरुषाला किंवा एखाद्या जातीबद्दल बोलणं आवश्यत नाही. पण या भाजपच्या काही लोकांना मतासाठी आणि सत्तेसाठी अशी सवय लागली आहे की, ते कोणत्याही विषयाला काहीही जोडतात. राजकीय लाभापोटी विनाकारण जात जोडली जाते', अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.

## '७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा निकाल बाकी'

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडमध्ये भाजपवर टीका केली होती. ज्यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला त्यांच्याचसोबत आपण सत्तेत आहोत, असं अजित पवार म्हणाले होते. तसेच त्यांनी भाजवर पिंपरी चिंचवडमध्ये भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप केला होता. त्यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात नुकतंच प्रत्युत्तर दिल्याचं बघायला मिळालं. त्यानंतर आता भाजपचे नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बावनकुळे यांनी अजित पवार यांना मोठा इशारा दिला आहे.अजित दादांना मी काही सूचना देईन किंवा सांगेल एवढा मोठा मी नाही. पण आमच्या महायुतीच्या समन्वय समितीत, ज्या समितीत मी स्वत: आहे, त्या समितीचं ठरलं होतं की, मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत लढताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक टीका होणार नाही याची काळजी घ्यावी. आम्ही समन्वय समितीने सूचित केल्यानुसार काळजी घेतली. पण अजित दादांनी ती काळजी घेतली नाही', असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## आधी चक्की पिसिंग, आता मांडीला मांडी लावून' ; सपकाळांचा हल्लाबोल

**नागपूर :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली. नागपूरमध्ये आयोजित एका राजकीय कार्यक्रमात बोलताना सपकाळ यांनी फडणवीस यांच्या भूमिकांवर, निर्णयांवर आणि राजकीय वाटचालीवर सवाल उपस्थित केले. ङ्कदेवा भाऊ आता कारभार चालवत आहेत, मात्र २०२४ चे देवा भाऊ हे वेगळेच आयटम झाले आहेत. 'कोण होतास तू, काय झालास तू' असे म्हणण्याची वेळ आली आहे,ङ्ख असा टोला त्यांनी लगावला. सपकाळ म्हणाले की, नागपूर, विदर्भच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात फडणवीस यांच्या कारभाराबाबत असंतोष आहे. ङ्कपोटातलं पाणी हालू देत नाही, पण गेम दाखवल्याशिवाय काही राहत नाही,ङ्ख असे म्हणत त्यांनी सरकारच्या कामकाजावर उपरोधिक टीका केली. पुढे बोलताना त्यांनी फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. ङ्ककोणाच्या करेक्ट कार्यक्रमाचा मास्टरमाइंड कोण आहे, महाराष्ट्रातील सर्वात मोठा गुंड कोण असेल तर आज देवेंद्र फडणवीस यांचे नाव घ्यावे लागेल,



असे वादग्रस्त विधान सपकाळ यांनी केले.दरम्यान, फडणवीस यांना 'दरिंदा' आणि 'जल्लाद' असे संबोधल्याच्या मुद्द्यावर त्यांनी स्पष्टीकरण दिले. ङ्कदरिंदा हा नॉन-पार्लमेंटरी शब्द नाही. त्याचा अर्थ क्रूर, उलट्या काळजाचा असा होतो. लोकशाहीला आणि संविधानाला फाशी देणारा माणूस म्हणून मी त्यांना जल्लाद म्हटले,ङ्ख असे सपकाळ म्हणाले. तसेच फडणवीस यांना 'गजनी' म्हणण्यामागील कारण स्पष्ट करताना त्यांनी फडणवीस यांच्या जुन्या विधानांचा संदर्भ दिला. वेगळ्या विदर्भाच्या मुद्द्यावर, अजित पवारांबाबत केलेली वक्तव्ये आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती न करण्याची भूमिका नंतर बदलल्याचा दाखला देत त्यांनी फडणवीस यांना काय बोलले ते आठवत नाही.

## ठाकरे बंधूंनी प्रचाराचा पॅटर्न बदलला, 'ती' भीती कारण ?

**मुंबई :** जाहीर सभांमधून विरोधकांवर टीकास्त्र सोडणाऱ्या ठाकरे बंधूंनी प्रचाराची रणनीती बदलली आहे. मुंबई महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधूंनी मुंबईत ठिकठिकाणी जाहीर सभा घेण्याऐवजी शाखा-शाखांना भेटी देण्याची रणनीती आखली आहे. बीएमसी निवडणूक काही दिवसांवर असताना स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उर्जितावस्था आणून प्रभावी प्रचारयंत्रणा राबवण्याचा हा त्यांचा प्रयत्न असल्याचे मानले जाते.मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रचार रंगायला सुरुवात झाली असताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी निवडणुकीच्या प्रचार रणनीतीत मोठा बदल केला आहे. जाहीर सभा घेऊन



प्रचाराची राळ उडवून देण्याऐवजी ठाकरे बंधूंनी यावेळी शाखाभेटींद्वारे प्रत्येक शिवसैनिक, मनसैनिक आणि सामान्य मुंबईकरांपर्यंत पोहोचण्याचे ठरवले आहे. जाहीर सभा आणि जाहीर प्रचारात वेळ न दवडता शाखा-शाखांवर जाऊन लोकांशी थेट संवाद साधण्याचा नवा पॅटर्न त्यांनी सुरू केला आहे.शाखांमध्ये भेटी देऊन तेथील संबंधित पदाधिकाऱ्यांना पाठबळ देणे, कोणत्याही आमिषांना बळी न पडता पक्षाचे निष्ठेने काम करणे अशा सूचना पदाधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. यातून कार्यकर्त्यांचे मनोबल वाढावे, असा या दोन्ही नेत्यांचा प्रयत्न असल्याचे समजते. नव्या पॅटर्ननुसार उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी, ६ जानेवारीला अंधेरी पूर्व, जोगेश्वरी तसेच दिंडोशी येथील शाखांना भेटी दिल्या. ७ जानेवारीला दादर माहीम, धारावी, चेंबूर, कुर्ला येथे तर ८ जानेवारीला वर्सोवा, कलिना, गोरेगाव येथील शाखांना ते भेटी देणार आहेत. ९ जानेवारीला उद्धव आणि राज ठाकरे यांची नाशिकमध्ये संयुक्त सभा होणार आहे. त्यानंतर १० जानेवारीला त्यांची संभाजीनगरमध्ये जाहीर सभा होईल. ११ किंवा १२ जानेवारीला शिवाजी पार्क येथे उद्धव-राज ठाकरेंची संयुक्त सभा होणार असल्याची माहिती शिवसेना उबाठा पक्षाचे नेते संजय राऊत यांनी दिली. प्रचारासाठी फारच कमी वेळ असल्याने ठाकरे हे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. ठाकरे बंधूंनी बदललेल्या रणनीतीवर भाजपने टीका केली आहे. मुंबईच्या सभांना गर्दी होणार नाही, या भीतीपोटी ठाकरे बंधू जाहीर सभा टाळत असल्याचा टोला भाजपने लगावला. ठाकरे बंधूंनी आधी ९ संयुक्त सभा घेण्याचे नियोजन केले होते. ती संख्या नंतर ७ पर्यंत खाली

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ओल्या टॉवेलवरून वाद अन लिव्ह-इन पार्टनरने दक्षिण कोरियन बॉयफ्रेंडला संपवलं



**नोएडा :** ओल्या टॉवेलच्या वापरावरून झालेल्या भांडणात मणिपूरमधील एका तरुणीने तिच्या दक्षिण कोरियन लिव्ह-इन पार्टनरची चाकूने वार करून हत्या केली आहे. ग्रेटर नोएडाच्या नॉलेज पार्क पोलिस स्टेशन परिसरातील सेक्टर-१५० मधील एका हाय-प्रोफाइल सोसायटीमध्ये ही भयंकर घटना घडल्याची माहिती आहे. पोलिसांनी सोमवारी आरोपी महिलेला न्यायालयात हजर केले आणि तिला तुरुंगात पाठवले. मृत तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनानंतर दूतावासाकडे सोपवण्यात आला आहे.पोलिस चौकशीत जे समोर आलं ते अत्यंत धक्कादायक आहे. आरोपी महिला, लुंजियाना पमाई (रा. बिष्णुपूर, मणिपूर) हिने सांगितले की, ती शनिवारी रात्री २ वाजताच्या सुमारास आंघोळ केल्यानंतर बाथरूममधून बाहेर पडली होती. तिने अनवधानाने तिच्या पार्टनर डक ही-लू याचा टॉवेल वापरला. डक ही-लू हा त्याच्या टॉवेल आणि स्वच्छतेबाबत खूप स्ट्रिक्ट होता. जेव्हा त्याने त्याचा टॉवेल ओला पाहिले तेव्हा तो संतापला आणि तिला शिवीगाळ करु लागला.यानंतर लुंजियानाने तिची बॅग घेतली आणि फ्लॅटमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, परंतु तरीही तो वाद घालत होता. लुंजियानाने दिलेल्या माहितीनुसार, डक ही-लूने तिला थांबवण्यासाठी भाजीचा चाकू हातात घेतला. त्यावेळी दोघेही दारूच्या नशेत होते. झटापटीत तिने चाकू हिसकावून घेतला आणि डक ही-लूच्या छातीत वार केले.पोलिस तपास आणि शवविच्छेदन अहवालातून असे दिसून आले की महिलेने त्याच्यावर फक्त एकदाच वार केला, परंतु तो इतका अचूक आणि खोल होता की तो छातीच्या डाव्या बाजूला, थेट हृदयात घुसला. खोल जखमेमुळे जास्त रक्तस्त्राव झाला आणि या दक्षिण कोरियन नागरिकाचा जागीच मृत्यू झाला.मूळ दक्षिण कोरियातील चेओंगजू येथील डक ही-लू गेल्या दोन वर्षांपासून नोएडामध्ये राहत होता. तो एका खाजगी मोबाईल फोन कंपनीत शाखा व्यवस्थापक म्हणून काम करत होता. त्याची भेट गुरुग्राममधील मणिपूर येथील रहिवासी लुंजियाना पमाईशी झाली. त्यानंतर, दोघेही सेक्टर-१५० मधील एटीएस पायस हायवेज सोसायटीमध्ये भाड्याच्या फ्लॅटमध्ये एकत्र राहू लागले.

नॉलेज पार्क पोलिस ठाण्यानुसार, घटनेची माहिती मिळाल्यानंतर, आरोपी महिलेला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. तिने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी हत्येत वापरलेला चाकू जप्त केला आहे. पोलिसांनी घटनेची माहिती दक्षिण कोरियाच्या दूतावासाला दिली आणि औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, मृतदेह त्यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

## तरुणाची गोळ्या झाडून आणि शस्त्राने वार करून निर्घृण हत्या

**बीड :** गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात आज दुपारी पुन्हा एकदा रक्ताचा सडा पडला. शहरातील अंकुश नगर भागात एका ३८ वर्षीय तरुणाची अज्ञात हल्लेखोरांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षद शिंदे (वय ३८, रा. धानोरा रोड, हाउसिंग कॉलनी, बीड) हा तरुण बीड नगरपालिकेत प्लंबिंगचे काम करत होता. आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो अंकुश नगर येथील शिवाजीनगर रोडवर आपल्या कामात व्यस्त होता. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी सुरुवातीला हर्षदवर दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच धावपळ उडाली. जखमी अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हर्षद जवळच असलेल्या एका पत्र्याच्या शेडच्या मागे धावत गेला. मात्र, हल्लेखोराने त्याचा



पाठलाग सोडला नाही. त्या ठिकाणी त्याला गाठून हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात हर्षद जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक बांगर यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## लग्न होताच नवरीला कळलं पतीचं सत्य

**नोएडा :** एका तरुणावर टक्कल असल्याचं लपवून लग्न केल्याचा आरोप आहे. इतकंच नाही तर सत्य समोर आल्यानंतर त्याच्यावर पत्नीला त्रास देण्याचा आणि पैसे उकळण्याचाही आरोप आहे.पत्नीच्या तक्रारीवरून नोएडा पोलिसांनी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे आणि तपास सुरू केला आहे. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, हे प्रकरण बिसरख पोलिस स्टेशन परिसरातील आहे. पीडितेचा आरोप आहे की तिचे लग्न नवी दिल्लीतील प्रताप बाग येथील एका तरुणाशी झाले होते. लग्नापूर्वी, त्याने सामान्य दिसण्यासाठी आणि त्याचं टक्कल लपवण्यासाठी विग किंवा कृत्रिम केस लावले होते. होणाऱ्या नवऱ्याला केस गळतीची समस्या असल्याचं तिला सांगण्यात आलं होतं. मात्र, लग्नानंतर जेव्हा ती पहिल्यांदाच सासरी पोहोचली तेव्हा पतीने घरी पोहोचल्यावर विग काढला, तेव्हा पीडितेला धक्काच बसला. तिच्या पतीचं टक्कल पडण्याचे सत्य तिला कळले.काही दिवसांपूर्वी, आरोपीने तिच्याकडून सुमारे दीड लाख रुपयांचे दागिने हिसकावून घेतले, तिला मारहाण केली आणि घराबाहेर काढले.

## घटस्फोट अन् बापानेच चिमुकल्या ऋत्विक आणि चैतन्यला संपवलं

**हैदराबाद :** एका व्यक्तीने आपल्या दोन मुलांचा गळा दाबून खून केला आणि नंतर त्यांचे मृतदेह जवळच्या कालव्यात फेकून दिल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर आरोपीने आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न केला, परंतु गावकऱ्यांनी त्याला वेळीच रुग्णालयात नेले, जिथे त्याची प्रकृती गंभीर आहे. तेलंगणातील नारायणपेट जिल्ह्यात ही धक्कादायक घटना समोर आली आहे. तेलरु येथील मरिकल मंडल या गावात ही घटना घडल्याची माहिती आहे.याप्रकरणी नारायणपेट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचे नाव शिवराम असे आहे. त्याने त्याच्या कुटुंबाला सांगितले की त्याची दोन्ही मुले आजारी आहेत आणि तो त्यांना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जात आहे. या बहाण्याने तो त्याच्या दोन्ही मुलांना ऋत्विक आणि चैतन्य यांना घराबाहेर घेऊन गेला. रात्री उशिरापर्यंत शिवराम आणि मुले परत न आल्याने कुटुंब चिंतेत पडले.पोलिस तपासात असे समोर आले आहे की, शिवराम मुलांना गावाबाहेरील शेतात घेऊन गेला, जिथे त्याने त्यांचा गळा आवळून खून केला. त्यानंतर त्याने




या दोघांचेही मृतदेह जवळच्या कालव्यात फेकून दिले. मुलांची हत्या केल्यानंतर शिवरामने कीटकनाशक प्यायले आणि ट्रान्सफॉर्मरने स्वतःला जाळण्याचा प्रयत्न केला. ही बाब स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आली. त्यांनी तात्काळ त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. जिथे त्याच्यावर उपचार करण्यात आले. डॉक्टरांच्या मते आरोपीची प्रकृती गंभीर आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत.त्यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले, दोन्ही मुलांचे मृतदेह कालव्यातून बाहेर काढण्यात आले आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन शवविच्छेदनासाठी पाठवले. पोलिसांनी हत्येसह संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

# घरात शिरताच भयंकर दिसलं, भिंतीत कुणीतरी अडकलेलं

**कोटा :** चोर चोरी करायला एका घरात शिरला पण मग त्याच्यासोबत जे घडलं त्याने त्याला चांगलीच अद्दल घडली. राजस्थानच्या कोटा येथील बोरखेडा पोलिस ठाणे हद्दीतील प्रताप नगर येथे राहणारे सुभाष रावत हे आपल्या पत्नीसह खाटूश्यामच्या दर्शनाला गेले होते. जेव्हा ते दर्शन करुन परतले तेव्हा त्यांना घरात जे दिसलं ते पाहून धक्काच बसला. त्यांच्या स्वयंपाक घरातील एझॉस्ट फॅनच्या खिडकीत त्यांना एक व्यक्ती अडकलेल्या अवस्थेत दिसून आला. त्याचे अर्धे शरीर आत तर अर्धे बाहेर होते. ही व्यक्ती एक चोर होती. जो चोरीच्या उद्देशाने त्यांच्या घरात शिरला होता. पण, तो पळू शकला नाही. त्यामुळे सुभाष रावत यांच्या घरात



चोरी झाली नाही.याबाबत सुभाष रावत यांनी सांगितलं की, ३ जानेवारीला ते पत्नीसह खाटूश्यामजीच्या दर्शनाला गेले होते. दुसऱ्या दिवशी रात्री उशिरा १२.५० वाजताच्या आसपास ते घरी परतले. जेव्हा ते त्यांची स्कुटी आत नेत होते तेव्हा त्यांना स्वयंपाक घराच्या भिंतीवरील एझॉस्ट फॅनचं छिद्र खुलं असलेलं दिसलं. जेव्हा त्यांनी आत जाऊन पाहिलं तेव्हा त्यांना या खिडकीत एक व्यक्ती अडकलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिस येईपर्यंत या व्यक्तीला बाहेर काढण्याचे अनेक प्रयत्न करण्यात आले. मात्र, त्याला बाहेर काढणे शक्य झाले नाही. त्यानंतर पोलिसांनी त्याला बाहेर काढलं. सुभाष यांनी पोलिसांना सांगितलं की, या आरोपीचा आणखी एक साथीदार होता. जो आम्हाला पाहून पळून गेला. जेव्हा आरडाओरड करण्यात आली, तेव्हा आसपासचे लोक जमले. रात्री १.१५ वाजता पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर या चोराला बाहेर काढून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी जेव्हा त्याला तपासलं तेव्हा त्याच्या खिशात एका कारची चावी आढळून आली. स्थानिकांनी सांगितलं की, रात्री एक संशयित कार परिसरात फिरताना दिसून आली होती.पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने ती कार आणि इतर आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. तसेच, ताब्यात असलेल्या आरोपीचीही चौकशी केली जात आहे. सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून लवकरच इतर आरोपींना पकडण्यात येईल, असं सांगण्यात आलं आहे. मात्र, या घटनेने परिसरात एकच गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे.

# वैभवच्या खेळीच्या जोरावर भारताचा विजय

**बेनोनी :** वैभव सूर्यवंशीच्या तुफानी फटकेबाजीच्या जोरावर यावेळी भारताने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर दमदार विजय साकारला. वैभव सूर्यवंशीने या समन्यात धमाकेदार फटकेबादी केली. वैभव या सामन्यात फक्त २४ चेंडूंच खेळला, पण फक्त एवढ्या चेंडूंत त्याने अशी दिमाखदार खेळी साकारली की, भारताला त्याने एकहाती विजय मिळवून दिला.वैभव सूर्यवंशीने भारताला या सामन्यात धडाकेबाज सुरुवात करून दिली होती. वैभवची फलंदाजी एवढी धमाकेदार होती की, त्याने अर्धशतक पूर्ण करेपर्यंत एकही चौकार मारला नव्हता, तो सर्व षटकारांच्या जोरावरच धावा वसूल करत होता. वैभवने पहिल्या षटकापासून आपले इरादे स्पष्ट केले होते. वैभवने यावेळी षटकार लगावतच आपले अर्धशतक पूर्ण केले. वैभवने या सामन्यात ६० धावा फक्त षटकारांच्या जोरावरच केल्या होत्या. वैभवने या सामन्यात फक्त २४ चेंडूंत १० षटकार आणि एका षटकाराच्या जोरावर ६८ धावांची दिमाखदार खेळी साकारली होती. वैभव सूर्यवंशीचा स्ट्राइक रेट यावेळी २८३ एवढा होता. भारताला या सामन्यात विजयासाठी दक्षिण आफ्रिकेने २४६ धावांचे आव्हान ठेवले होते. पण या सामन्यात पाऊस पडला आणि बरेच वेळ वाया गेला. त्यामुळे या सामन्यात भारताला विजयासाठी २७ षटकांत १७४ धावांचे आव्हान देण्यात आले होते.दक्षिण आफ्रिकेच्या १७४ धावांचा पाठलाग करताना भारताने चांगली फलंदाजी केली. पाऊस पडला होता आणि त्यामुळे खेळपट्टी गोलंदाजीला पोषक ठरलेली होती. पण भारताच्या वेदांत त्रिवादी आणि अभिग्यान कुंडू यांनी अखेरपर्यंत किल्ला लढवला आणि संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. वेदांतने यावेळी ४ चौकारांच्या जोरावर ३१ धावा केल्या, तर अभिग्यानने तीन चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ४८ धावांची दमदार खेळी साकारली. भारताने हा सांमना आठ विकेट्स आणि २१ चेंडू राखून सहजपणे जिंकला.भारताने या सामन्यात अचूक आणि भेदक मारा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला २४५ धावांत रोखल होते. भारताकडून किशन सिंगने सर्वाधिक चार विकेट्स घेतले होते, तर अंब्रिशने त्याला दोन बळी मिळवत सुयोग्य साथ दिली होती.




## बांगलादेशचाच होणार गेम, भारताला कोंडीत पकडायला गेले आणि..

**नवी दिल्ली :** बांगलादेश भारताची कोंडी करायला गेला खरा, पण आता त्यांचाच गेम होणार असल्याचे समोर आले आहे. बांगलादेशने आपले सामने कोलकाता येथे सुरक्षेच्या कारणास्तव ठेवू नये, असे म्हटले आहे. भारतामधून आपले सामने बाहेर खेळवावे, जेणेकरून त्यांचे करोडोचे नुकसान होईल, असे बांगलादेशला वाटत होते. पण आता हीच गोष्ट त्यांच्या अंगलट येणार असल्याचे समोर आले आहे.बांगलादेशमध्ये हिंदूवर अत्याचार होत आहेत. बऱ्याच हिंदूचा बांगलादेशमध्ये जीवही घेतला गेला आहे. बांगलादेशमध्ये जे हिंदूवर हल्ले होत आहेत, त्याचे व्हिडिओ जगभरात व्हायरल होत आहेत. त्यामुळे भारतीयांच्या मनात बांगलादेशबाबत रोष आहे. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंनाही भारतात एंट्री देऊ नये, अशी भावना नागरिकांच्या मनात होती. पण बीसीसीआय मात्र हे ऐकायच्या मनस्थितीत नव्हती. पण अखेर भारतीयांचा राग पाहून त्यांना बांगलादेशच्या खेळाडूना आयपीएलमध्ये न खेळवण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशचा मिस्ताफिझूर रेहमान हा केकेआरमधून खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बांगलादेशने आयपीएलवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला त्याचबरोबर आपले वर्ल्ड कपमधील कोलकाता येथील



सामने दुसरीकडे खेळवण्याची मागणी केली, जेणेकरून भारताला धक्का देता येईल. पण भारताचा गेम करायला गेले आणि त्यांचाच गेम होणार असल्याचे समोर आले आहे. कारण आयसीसीचा मोठा नियम आता समोर आला आहे.बांगलादेशने आयसीसीला सांगितले आहे की, कोलकातामधील सामने तिथे खेळवू नयेत. पण जर आयसीसीने त्यांना नकार दिला तर काय, ही सर्वात मोठी गोम आहे. कारण त्यानंतर बांगलादेशने ही गोष्ट मान्य केली नाही तर काय होऊ शकते, यासाठी आयसीसीचा एक नियम सर्वात महत्वाचा ठरतो. जर एखादा देश ठराविक ठिकाणी खेळण्यास तयार नसेल आणि त्यासाठी सबळ कारण देत नसेल, तर आयसीसी त्यांना वर्ल्ड कपमध्ये खेळणार की नाही, असा प्रश्न विचारू शकते. बांगलादेशने त्यानंतर होकार दिला तर त्यांना भारतात येऊन खेळावे लागेल, जी त्यांची हार असेल.

## कोहलीची विजय हझारे ट्रॉफीमधून माघार

**दिल्ली :** विराट कोहली हा विजय हझारे ट्रॉफीत भन्नाट फॉर्मात होता. विराट कोहली या स्पर्धेचे पहिले दोन सामने खेळला होता. या दोन्ही सामन्यांत त्याने दमदार कामगिरी केली होती. विराट कोहली तिसरा सामनाही खेळणार असल्याचे म्हटले जात होते. पण आता विराट कोहली या स्पर्धेमधून माघार घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. विराट कोहील या स्पर्धेमधून का माघार घेणार आहे, याची माहिती आता समोर आली आहे.विराट कोहली दक्षिण आफ्रिकेच्या वनडे मालिकेत जोरदार फॉर्मात होता. या मालिकेत सर्वाधिक धावा त्याच्या नावावर होत्या आणि त्यामुळेच त्याला मालिकावीर पुरस्कारही मिळाला होता. विराट कोहलीने हा आपला फॉर्म कायम ठेवला होता. विराट कोहलीने विजय हझारे ट्रॉफीचा पहिला सामना चांगलाच गाजवला होता. विराट कोहलीने या सामन्यात शतक झळकावले होते, या शतकासह विराट कोहलीने महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचाही वर्ल्ड रेकॉर्ड मोडला होता. विराट कोहली या स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यातही दमदार फलंदाजी करत होता. विराट कोहलीने अर्धशतक झळकावले होते, त्यानंतर तो शतकाच्या दिशेने कूच करत होता. पण यावेळी त्याला शतक पूर्ण करता आले नाही.

## बांगलादेशच्या खेळाडूंना जर भारतात यायचं नसेल तर..

**नवी दिल्ली :** बांगलादेश आता भारताला धमकी देत आहे. भारतात होणाऱ्या टी २० वर्ल्ड कपमध्ये आमचे सामने कोलकाता येथे खेळवून नयेत, असे त्यांनी म्हटले आहे. भारताला कोंडीत पकडण्यासाठी आता बांगलादेश हे कृत्य करत असल्याचे उघड आहे. पण आता भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगने चोख उत्तर दिले आहे.बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूचे बळी घेतले जात आहेत, त्यांच्यावर अत्याचार होत आहे आणि ही गोष्ट जगभरात सर्वांना माहिती आहे. बांगलादेशमध्ये हिंदूवर जे हल्ले झाले त्याचे व्हिडिओ जगभरात व्हायरल झाले आहेत. त्यामुळे भारतात बांगलादेशच्या खेळाडूंना एंट्री देऊ नये, असे म्हटले जात होते. कारण भारतीयांच्या मनात बांगलादेशबद्दल राग निर्माण झाला. बांगलादेशचा मिस्ताफिझूर रेहमान हा आयपीएलमधील केकेआरच्या संघात होता. सुरुवातीला त्याला केकेआर सोडायला तयार नव्हती. पण अखेर त्यांना रेहमानला सोडायला लागले. रेहमान आयपीएलध्ये खेळणार नसल्याचे समजताच, बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने कांगावा करायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी आयपीएलवर बंदी आणली आणि आता कोलकातामध्ये आम्ही सामने खेळणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.हरभजन सिंग याबाबत



म्हणाला की, ' गेल्या काही महिन्यांत बऱ्याच गोष्टी घडल्या आहेत. बांगलादेशमधील वातावरण सर्वांनाच माहिती आहे. आता बांगलादेशला भारतात खेळायला यायचे नाही. टी २० वर्ल्ड कपचे सामने त्यांना भारतात खेळायचे नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. पण त्याने कोणाला जास्त नुकसान होईल, याचा विचार त्यांनीही करावा. बांगलादेशला जर आपल्या खेळाडूंना भारतात पाठवायचं नसेल तर आम्ही काहीही करू शकत नाही. पण जर बांगलादेशने आपल्या खेळाडूंना भारतात पाठवलं तर त्यांचे आम्ही स्वागत करू. पण हा निर्णय त्यांच्यावर दुरागामी परीणाम करणारा असे, याचा विचारही त्यांनी करायला हवा. ' हरभजन सिंगने स्पष्टपणे यावेळी बांगलादेशला आव्हानच दिलं आहे, जर भारतात खेळायला आला नाहीत तर त्यांच्यावर वाईट परीणाम होतील.

# मोहम्मद शमीला निवडणूक आयोगाची नोटीस



**नवी दिल्ली :** भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला आता भारतीय निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे. या नोटीसीमध्ये आता मोहम्मद शमीला फक्त सहा दिवसांत हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. हे प्रकरण नेमकं आहे तरी काय, हे आता समोर आलं आहे.मोहम्मद शमीच्या अडचणीत वाढ होत असल्याचे दिसत आहे. मोहम्मद शमी हा विजय हझारे ट्रॉफी गाजवत आहे. पण तरीही त्याला गौतम गंभीर यांनी भारताच्या संघात स्थान दिले नाही. त्यामुळए मोहम्मद शमीचे करीअर संपल्याचे आता म्हटले जात आहे. कारण जर यावेळी संघात स्थान दिले नाही तर वनडे वर्ल्ड कपसाठी त्याचा विचार केला जाणार नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे त्याला भारताचा संघ जेव्हा जाहीर झाला तेव्हा मोठा धक्का बसला होता. तेव्हा शमीचे नाव जोरदार चर्चेत होते. आता पुन्हा एकदा मोहम्मद शमी हा चर्चेत आला आहे. पण आता त्याला भारताच्या निवडणूक आयोगाने थेट नोटीस पाठवली आहे.मोहम्मद शमीला आता भारताच्या निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे आणि सहा दिवसांत हजर राहण्यासाठी बजावले आहे. गेल्या वर्षी १६ डिसेंबरला पश्चिम बंगालमध्ये सुरू झालेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीशी (डखठ) संबंधित प्रकरणासंदर्भात सोमवारी (५ जानेवारी) ही नोटीस बजावण्यात आली. मोहम्मद शमी गेल्यावेळी नोंदणी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहू शकला नव्हता. मोहम्मद शमी आणि त्याच्या भावाला सुरुवातीला दक्षिण कोलकात्याच्या जाधवपूर परिसरातील कार्टजू नगर शाळेत सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (अएठज) यांच्यासमोर हजर राहण्यास सांगण्यात आले होते, परंतु राजकोटमध्ये पश्चिम बंगालसाठी होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी सामन्यात व्यस्त असल्याने शमी उपस्थित राहू शकला नाही. आता त्यांना पुढच्या सहा दिवसांत म्हणजेच ११ जानेवारीला पुन्हा हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. यावेळी काहीही करून मोहम्मद शमीला उपस्थित राहावे लागणार आहे, जर शमी यावेळी उपस्थित राहीला नाही तर त्याच्यार मोठी कारवाई केली जाऊ शकते.मोहम्मद शमीला आता भारताच्या निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे. त्याचबरोबर येत्या सहा दिवसांत हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

# इन्स्टाग्राम Live सुरू असताना प्राजक्ता माळीचं नम्रता संभेरावला धमाल सरप्राइज

**मुंबई :** अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या 'प्राजक्तराज' या दागिन्यांच्या ब्रँडला ६ जानेवारी २०२६ रोजी तीन वर्ष पूर्ण झाली. याशिवाय दर महिन्याच्या ६ तारखेला प्राजक्ता जुनी परंपरा जपणारा एखादा मराठमोळा दागिना 'प्राजक्तराज'च्या साइटवर लॉन्च करते. असं दुहेरी निमित्त असल्याने प्राजक्ता मंगळवारी इन्स्टाग्रामवर लाइव्ह आली होती. तिने या खास दिवशी तिची जवळची मैत्रीण आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील तिची सहकारी नम्रता संभेराव हिच्या हस्ते 'शिंदेशाही तोडे' हा दागिना लॉन्च केला.प्राजक्ताने या लाइव्हमध्ये सुरुवातीला सांगितले की, हास्यजत्रेचं शूट संपल्यानंतर ती आणि नम्रता लाइव्ह आल्या आहेत. चकग मधील 'शितली'च्या लूकमध्येच ती या लाइव्हसाठी उपस्थित होते. तसेच आजारी असूनही नम्रता लाइव्ह करण्यासाठी तयार झाल्याचे प्राजक्ताने सांगितले. यावेळी नम्रताने प्राजक्ताच्या व्यावसायिक यशाचे कौतुक केले



आणि तिच्याविषयी अभिमान व्यक्त केला. तिने नम्रताच्या हस्ते इमिटेशन ज्वेलरीमध्ये 'शिंदेशाही तोडे' लॉन्च केले. लाइव्हदरम्यान प्राजक्ता तिच्या कलेक्शनमध्ये आलेल्या या दागिन्याविषयी माहिती देत होती, तसेच मध्येच त्या सोन्याच्या भावाविषयीही गप्पा मारताना दिसल्या. तसेच प्राजक्ता तिच्या वेबसाइटविषयीही भरभरुन बोलत होती. या चालू लाइव्हमध्येच प्राजक्ताने जाहीर केले की, हे तोडे ती नम्रताला भेट म्हणून देणार आहे. ती अचानक म्हणाली की, 'हा दागिना आज मी नमाला गिफ्ट करते.' प्राजक्ताचं हे वाक्य नम्रतासाठी सुखद धक्का ठरला आणि ती मोठ्याने ओरडते.खऱ्या सोन्याचा दागिना दिल्याप्रमाणे तिने प्रतिक्रिया दिली, असंही प्राजक्ता तिला म्हणाली. नम्रताचा आनंद गगनात मावेनासा झाला. ती प्राजक्ताला आवर्जुन सांगते की, हे तोडे ती आता प्रत्येक काठपदराच्या साडीवर मिरवणार आहे. प्राजक्ताला ती मिठीही मारते. या मैत्रिणींचा हा खास व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. अनेकांनी व्हिडिओवरकमेंट करत प्राजक्ता-नम्रताचा हा व्हिडिओ खूपच गोड असल्याचे म्हटले.

## प्रचारावेळी गालबोट बिल्डिंगला आग लागताच पळ काढल्याने संतापली अभिनेत्री डेझी शाह



**मुंबई :** काही वेळेस कार्यकर्त्यांना उत्साहाच्या भरात काही गोष्टींचे भान राहत नाही आणि मग अनर्थ घडतो. मुंबईत असाच एक प्रकार घडला. प्रचारावेळी गालबोल लागले आहे. या सर्व प्रकरणी अभिनेत्रीने आवाज उठवला आहे. सलमान खानसोबत काम केलेली अभिनेत्री डेझी शाहने सोशल मीडियावर एक भयानक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या व्हिडिओ मध्ये तिने तिच्या घराशेजारील इमारतीला आग लागल्याचे दाखवले आहे. लोक प्रचार करत असल्याने आग लागली कारण ते फटाके फोडत होते असे तिने म्हटले आहेव्हिडिओमध्ये, अभिनेत्री डेझी शाह आग लागलेल्या इमारतीच्या खाली आहे. ती व्हिडिओत म्हणतेय, 'इथे लोक जमले आहेत. निवडणुका सुरू आहेत. ते रस्त्यावर फटाके फोडत आहेत. यामुळे कोणाच्या तरी घराला आग लागली आहे.'काही मूर्ख सरकारी अधिकारी रस्त्यावर फटाके फोडत होते. त्यांना समजत नाहीये का ? त्यांनी आग लावलीय. ते सर्वांच्या इमारतींमध्ये जाऊन प्रचार करत आहेत आणि आग लागल्यानंतर ते पळून गेले. माझे घर त्याच्या शेजारीच आहे जिथे हे सगळं घडतंय,' असे डेझी शाह म्हणाली.व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्रीने लिहिले, 'मझा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही! पण जेव्हा तुम्ही तुमच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी एखाद्या टीमला नियुक्त करता तेव्हा कृपया त्यांना थोडी अक्कल आहे का याची तरी खात्री करा. सुदैवाने, आमच्या बिल्डिंग कमिटीने त्यांना घरोघरी जाण्यास मनाई केली होती. इमारतीजवळ फटाके फोडणे योग्य नाही. जेव्हा लोकांमध्ये सिव्हिक सेन्स नसतो तेव्हा असे घडते. ही नैसर्गिक आपत्ती नाही; ही घटना त्या मूर्ख लोकांमुळे घडली आहे.



## बिपाशा बसूचा ४७ वा वाढदिवस

### बंगाली सुंदरीच्या करिअर आणि लव्ह लाईफवर एक नजर

**मुंबई :** बॉलिवूडमध्ये आपल्या आयटम नंबरने खळबळ उडवून देणारी बंगाली सुंदरी बिपाशा बसू आज तिचा ४७ वा वाढदिवस साजरा करत आहे. वाढदिवसानिमित्त तिचे चाहते तिला सोशल मीडियावर शुभेच्छा देत आहेत. ७ जानेवारी १९७९ रोजी एका बंगाली कुटुंबात जन्मलेली बिपाशा बसू एका मुलीची आहे. बिपाशा आई झाल्यापासून सिनेसृष्टीपासून दूर असली तरी सोशल मीडियावर ती खूप सक्रिय असते.एक काळ असा होता जेव्हा चाहते तिच्या अभिनयाची आणि बोल्ड स्टाईलची आतुरतेने वाट पाहत असत. अभिनेत्रीच्या अफेअरच्या गोष्टी इंडस्ट्रीत चर्चेत आल्या. तिचे नाव जॉन अब्राहमपासून फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोपर्यंत अनेक सेलिब्रिटींशी जोडले गेले आहे. बिपाशा बसूच्या वाढदिवसानिमित्त, तिच्या करिअर आणि लव्ह लाईफवर एक नजर टाकूया. बिपाशा बसूने वयाच्या १७ व्या वर्षी मॉडेल म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. तिने २००१ मध्ये 'अजनबी' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तिने 'राज', 'जिस्म', 'नो एंट्री', 'धूम २', 'फिर हेरा फेरी' आणि 'बचना ए हसीनो' यांसह अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. बॉलिवूड व्यतिरिक्त, अभिनेत्रीने तमिळ, तेलुगू आणि बंगाली चित्रपटांमध्ये तिच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. अलोन या सिनेमात ती अखेरची दिसली होती. या सिनेमात तिने तिचा नवरा करण सिंह ग्रोवरसोबत काम कलेले. चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान बिपाशा आणि करण प्रेमात पडले. त्यांनी २०१६ मध्ये लग्न केले.करण सिंग ग्रोव्हरच्या आधी, बिपाशाचे नाव अनेक सेलिब्रिटींशी जोडले गेले होते. एक काळ असा होता जेव्हा बिपाशा आणि राणा दग्गुबती यांच्या प्रेमाच्या कथा सर्वत्र चर्चेत होत्या. दोघांच्या अफेअरची बातमी पसरू लागली. त्यानंतर बिपाशाच्या आयुष्यात डिनो मोरिया आला, पण हे नातेही लवकरच संपले. मग एक वेळ आली जेव्हा जॉन अब्राहम आणि बिपाशाच्या प्रेमप्रकरणाची सर्वत्र चर्चा झाली. त्यावेळी बिपाशा आणि जॉन हे बी-टाउनचे हॉट कपल मानले जात होते. त्यांचे नाते सुमारे ९ वर्षे टिकले, परंतु एके दिवशी जॉन अब्राहमने मीडियाला सांगितले की तो आणि बिपाशा आता वेगळे झाले आहेत. खरेतर जॉनने बिपाशाला न सांगता एक ट्विट केले होते ज्यामध्ये त्याने त्याचे वेगळेच नाते जाहिर केलेले. सकाळी जेव्हा बिपाशाला ही गोष्ट समजली तेव्हा तिला फार मोठा धक्का बसलेला.जॉन व्यतिरिक्त, बिपाशा बसूचे नाव क्रीडा दिग्गज क्रिस्टियानो रोनाल्डोशी देखील जोडले गेले आहे. स्टार फुटबॉलपटू रोनाल्डो आणि बिपाशाने एकमेकांना किस केल्याची बातमी समोर आली होती. त्यांचे फोटोही व्हायरल झालेले ज्यामुळे इंटरनेटवर खळबळ उडाली. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, बिपाशा आणि रोनाल्डोमधील हा किस २००७ मध्ये झाला होता. यादरम्यान दोघांचा एक फोटोही समोर आला आहे. असेही म्हटले जाते की ते एकत्र एका कार्यक्रमात गेले होते आणि नंतर एका पार्टीत एकत्र दिसले.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत जिल्ह्यात तिळाचे १०० टक्के अनुदानावर बियाणे वितरण

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत तेलबिया गळीतधान्य कार्यक्रम अंतर्गत उन्हाळी हंगाम २०२५-२६ करिता तिळाचे प्रमाणित बियाणे १०० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र शासनामार्फत बुलढाणा जिल्ह्यासाठी हे बियाणे वाटप करण्यात येणार असून शेतकऱ्यांना तिळाचे उत्पादन वाढविण्यासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनी बियाण्यांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. देशातील खाद्यतेल आयात कमी करणे, स्वावलंबन साध्य करणे तसेच तेलबिया उत्पादनात वाढ करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे व सुधारित वाणांचा प्रसार करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. यानुसार तिळासाठी हेक्टरी २.५ किलो (रु. १९७ प्रति किलो) प्रमाणित बियाणे वितरीत केले जाणार आहे. या योजनेत प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर ते कमाल १ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पॅकिंग साईजप्रमाणेच बियाणे देण्यात येणार असून पॅकिंग साईजमुळे क्षेत्रापेक्षा अधिक बियाणे मिळाल्यास त्या अतिरिक्त बियाण्याची रक्कम लाभार्थ्यांना स्वतः भरावी लागेल. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे. अर्ज प्रक्रिया https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या संकेतस्थळावरील कृषी विभागातील प्रमाणित बियाणे वितरण, पिक प्रात्यक्षिके, खते-औषधे या टाईलद्वारे करता येईल. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर होणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# बुलढाण्यात शुक्रवारी अंमली पदार्थ विरोधी मार्गदर्शन शिबिर

**जनसंचलन/ बुलढाणा**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या ड्रग अव्हेरनेस अँड वेलनेस नेव्हीगेशन फार ड्रग फ्रि इंडीया योजना २०२५ अंतर्गत दि. ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता राजर्षी शाहू औषध निर्माण महाविद्यालय, बुलढाणा येथे अंमली पदार्थ विरोधी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नार्कोटिक कंट्रोल ब्यूरोने अंमली पदार्थांच्या सेवनाविरुद्ध तयार केलेल्या , म या घोषवाक्याच्या अनुषंगाने यावेळी शपथवाचन करण्यात येणार आहे. त्यानंतर अंमली पदार्थ व मनोव्यापारक पदार्थ अधिनियम, १९८५( ), औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५, अंमली पदार्थांचे सेवन, त्याचे दुष्परिणाम तसेच कायद्यातील तरतुदी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश नितीन पाटील राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून, अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (औषधे), गजानन घिरके, केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनाचे अध्यक्ष गजानन शिंदे तसेच राजर्षी शाहू औषध निर्माण महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष जैन उपस्थित राहणार आहे. मार्गदर्शन शिबिर अन्न व औषध प्रशासन बुलढाणा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणा, केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना बुलढाणा तसेच राजर्षी शाहू औषध निर्माण महाविद्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# चिखलीत मुक्ता साळवे यांची जयंती साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**

जाफ्राबाद रोड चिखली येथे सौं सिंधुताई बोरकर यांचे अध्यक्षते खाली मुक्ता साळवे यांची जयंती साजरी करण्यात आली. पहिली क्रांतिकारी दलित विद्यार्थिनी, लेखिका मुक्ता साळवे यांचा जन्म ५जाने. १८४० रोजी पुणे येथे झाला. आद्यक्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या त्या पुतणी आहेत. फुले दामपत्याने पुण्यामध्ये सुरु केलेल्या शाळेमधली मुक्ता साळवे ही मातंग समाजातील पहिली विद्यार्थिनी, मुक्ता साळवे म्हणजे दलित समाजातील पहिली स्त्री विद्यार्थिनी असा आदर्श निर्माण-- केला. मुक्ता साळवे ह्या महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांची आवडती विदयार्थीनी होत्या. सन १८५५ मध्ये तत्कालीन व्यवस्थे विरुद्ध आवाज उठविण्यासाठी महार मांग यांचे दुःखा विषयी निबंध लिहिला. या निबंधाच्या माध्यमातून तत्कालीन अस्पृश्य समाजाचे दुःख सर्वप्रथम जगासमोर मांडले हे लेखन एवढे क्रांतिकारी होते की, त्याचा अनुवाद त्यवेळच्या इंग्रजी सह सर्व भाषामध्ये भाषांतरित होऊन ज्ञानोदय सह सर्व वृत्तपत्रामध्ये छापण्यात आला. जगात सर्वप्रथम दलितांच्या समस्याची जाणीव तत्कालीन समाजव्यवस्था तसेच ब्रिटिश सरकारला करून दिली म्हणून मुक्ता साळवेचा हा निबंध जगप्रसिद्ध झाला. महणूनच मुक्ता साळवे जागतिक पातळीवर भारतातील दलित लेखिका म्हणून ओळखले जाते. मुक्ता साळवे यांनी केलेले लिखाण त्यांचे कार्यें आजही प्रेरणादाई आहे. आज त्यांची जयंती अण्णाभाऊ साठे सोशल फोरम, तसेच समाबांधवाच्या वतीने साजरी करण्यात आली यावेळी त्यांचे चरणी नतमस्तक हाऊन सर्वांनी अभिवादन केले. या प्रसंगी अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचे तालुका अध्यक्ष प्रदीप साळवे तंटामुक्ती अध्यक्ष शेलूद, निंबाजी साळवे,विदर्भ संघटक हिवरा, संतोष गायकवाड भावी जी. प. सदस्य मेरा, अंत्री सर्कल. रामदासभाऊ कांबळे सामाजिक,कार्य कर्ता, सचिन कांबळे, विनायक साळवे, विष्णू हिवाळे, धीरज मोरे किरण बोरकर, भा. ज. पा. अनु जाती जिल्हा उपध्यक्ष, तुकाराम उबाळे, सुनील निकाळजे, गोविंद बोरकर,सिंधुताई बोरकर, सौं रिता ताई कांबळे, सुशीला तायडे, दीपाली बोरकर, मंगला खंदारे इ. उपस्थित होते. मान्यवारांची समायोचित भाषणे झाली. त्यामध्ये निबाजी साळवे, प्रदीप साळवे दीपाली बोरकर सचिन कांबळे. का कार्यक्रमाचे सूत्र संचालन दिगंबर पाटोळे यांनी केले. आभार प्रदर्शन किरण बोरकर यांनी केले चहापाणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# देऊळगाव राजात शाळकरी मुलावर चाकूहल्ला; गुन्हा दाखल...




**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

शहरातील शिवाजी शाळेच्या प्रवेशद्वारासमोर सायंकाळी एका अल्पवयीन विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला केल्याची घटना ६ जानेवारी रोजी घडली. शाळा सुटण्याच्या वेळेतच हा प्रकार घडल्याने गोंधळ उडाला होता. या घटनेनंतर पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात हल्लेखोर युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक अल्पवयीन विद्यार्थी मंगळवारी दुपारी ४:३० वाजताच्या सुमारास शाळेतून घरी परतत असताना शिवाजी शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ ही घटना घडली. राहुल दीपक पिंपळे (रा. लालबाग, राजीव गांधी नगर, जालना) या युवकाने चाकूने हल्ला केल्याचा आरोप आहे या हल्ल्यात अल्पवयीन विद्यार्थी जखमी झाला आहे. हल्ल्यानंतर जखमी विद्यार्थ्याला तातडीने रुग्णालयात दाखल आले. घटनेची करण्यात माहिती मिळताच देऊळगाव राजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तोंडी तक्रारीवरून रात्री १०.३५ वाजता गुन्हाची नोंद करण्यात आली. या प्रकरणी पोलिस हेड कॉन्स्टेबल गणेश जायभाये यांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिस निरीक्षक ब्रह्मा यांच्या गिरी मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राजकुमार कांबळे पुढील तपास करीत आहेत. आरोपीला अटक झाली आहे का, तसेच हल्ल्यामागील नेमके कारण काय, याचा शोध पोलिस घेत असून तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. शाळा परिसरातच अल्पवयीन मुलावर चाकूहल्ला झाल्याने नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, शाळा परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे

# विवेकानंद आश्रमात उत्सवाला मोठ्या उत्साहात प्रारंभ...

## शोभायात्रेने होणार उद्घोष

## तीन दिवस ज्ञान, भक्ती, अन्नदानाचा महायज्ञ

जनसंचलन/हिवरा आश्रम




विवेकानंद आश्रमात तीन दिवसीय ज्ञानयज्ञ उत्सवास प्रारंभझाला असून, शोभायात्रेने या वैचारिक पर्वाचा उद्घोष केला जाणार आहे. या उत्सवात ज्येष्ठ तत्वचिंतक, प्रबोधनकार आणि निरूपणकार समाजजागृतीचे कार्य करतील. स्वामी विवेकानंद व प.पू. शुकदास महाराजांच्या विचारपरंपरेचा वारसा पुढे नेणारा हा उत्सव केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न राहता, ग्रामीण समाजाच्या बौद्धिक जडणघडणीचा केंद्रबिंदू ठरला आहे. उत्सवाच्या पहिल्याच दिवशी हरिहरतीर्थापासून स्वामी विवेकानंद व प.पू. शुकदास महाराजांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा निघणार टाळ-आहे. मृदंगाच्या गजरात शेकडो दिंड्या सहभागी होऊन विवेकानंद विचारांचा जयघोष करतील. महाराष्ट्रातील विशेषतः ग्रामीण भागात स्वामी विवेकानंदांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य प. पू. शुकदास महाराजांनी आयुष्यभर केले. बुद्धिजीवी वर्तुळापुरते मर्यादित असलेले विचार त्यांनी विद्यार्थ्यांच्या खोल्यांत, शेतकऱ्यांच्या तीन दिवस धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित राहणार! विवेकानंद आश्रम बांधावर आणि मध्यमवर्गीयांच्या दैनंदिन जीवनात रुजवले. त्यातूनच विवेकानंद आश्रम ज्ञानभूमी व सेवाभूमी म्हणून उभा राहिला. पौष वद्य पंचमी ते सप्तमी या कालावधीत सुमारे ६० वर्षांपूर्वी युवकांच्या सहकार्याने सुरू झालेला हा उत्सव आज व्यापक स्वरूप धारण करीत आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचलेला हा उपक्रम वैचारिक संवादाचे व्यासपीठ बनला आहे. यंदाच्या उत्सवासाठी नियोजन पूर्ण झाले असून, भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याचे प्रयत्न आश्रम प्रशासनाकडून करण्यात आले आहेत. गुरुवारी सकाळी हरिभक्त परायण गजाननदादा शास्त्री पवार महाराज यांचे व्याख्यान होईल. दुपारी कीर्तन व त्यानंतर शोभायात्रा निघेल.

# मेहकर येथे २० दिवस स्वच्छता अभियान

## पदभार घेताच नगराध्यक्ष गारोळे ॲक्शन मोडवर!

जनसंचलन/मेहकर

नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारताच नवनिर्वाचित नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी प्रशासनाला तातडीने कामाला लावले आहे. सोमवारी औपचारिक पदग्रहणानंतर दुपारच्या सत्रात नगरपालिकेतील सर्व विभागप्रमुखांची सहविचार सभा घेण्यात आली. यावेळी शहराच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत ६ ते २६ जानेवारीदरम्यान शहरव्यापी स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत शहराची सद्यस्थिती, प्राधान्याने हाती घ्यावयाची कामे, आगामी मेहकरमध्ये स्वच्छता अभियानास प्रारंभ झाला. विकास नियोजन तसेच प्रशासनाने ठरवावयाच्या दिशांवर सखोल चर्चा झाली. काम, स्वच्छता आणि नियोजन या त्रिसूत्रीवर शहर विकासाचा आराखडा तयार करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पदभार स्वीकारल्यानंतर तत्काळ प्रशासकीय यंत्रणेशी थेट संवाद साधून कामांना गती देण्याचा स्पष्ट संदेश नगराध्यक्षांनी दिल्याने प्रशासनात सकारात्मक हालचाल सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर ६ ते २६ जानेवारीदरम्यान प्रभाग क्रमांक १ ते १३ मध्ये शहरव्यापी स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानाची सुरुवात शारंगधर येथील बालाजी मंदिर परिसराची स्वच्छता करून करण्यात आली. पुढील टप्प्यात शहरातील रस्ते, नाले, सार्वजनिक ठिकाणे तसेच वसाहतींची सखोल साफसफाई करण्यात येणार आहे. अभियानाच्या प्रारंभी आमदार सिद्धार्थ खरात, नगराध्यक्ष किशोर गारोळे, विविध पक्षांचे गटनेते, नगरसेवक, नगरपालिकेचे कर्मचारी तसेच उद्धवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि किसान सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वच्छता केवळ अभियानापुरती न राहता ती कायमस्वरूपी टिकवण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा असल्याचे आवाहन करण्यात आले

# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळेला राज्यस्तरीय आमेध क्रीडा महोत्सवात रजत पदक




जनसंचलन/बुलढाणा

नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ अश्वमेध क्रीडा महोत्सवामध्ये बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची बी.एस्सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळे हिने रजत पदक पटकावून दैदिप्यमान यश संपादित केले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रभरातील सर्व विद्यापीठाचे हजारो खेळाडू ॲथलेटिक्स व इतर खेळांमध्ये सहभागी झाले होते. कु. पुनम हिने यापूर्वी विद्यापीठस्तरीय २०० मीटर धाव स्पर्धा आणि ४०० मीटर रिले रेस या दोन्ही स्पर्धा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. कु. पुनम हिचा महाविद्यालयीन स्तरावर सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सत्कार करून भरभरुन शुभेच्छा दिल्या. या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले. भविष्यात कु. पुनम राष्ट्रीय पातळीवर नक्कीच मॉडेल डिग्री कॉलेजचे नांव आणखी उज्वल करून देईल, असा विश्वास याप्रसंगी प्राचार्य डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी व्यक्त केला.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी गुन्हा

जनसंचलन/मलकापूर

तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. यासंदर्भात मलकापूर ग्रामीण पोलिस स्टेशनला दाखल तक्रारीवरून आरोपीविरुद्ध पोक्सो तसेच विविध कलमांन्वये ६ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीनुसार, आरोपी करण दादाराव वानखेडे (वय १९) हा पीडितेचा पाठलाग करायचा, तसेच त्याने बसमध्ये विनयभंग केल्याचा आरोपही तक्रारीत केला आहे. आरोपीने जवळीक साधून पीडितेवर अत्याचार केला व तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत केला आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम ७४, ७५, १३७ (२), ६४(१), ११५ (२), ३५१ (२) (३), बीएनएस सह कलम ४, ६, ८, १२, पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८